



**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# पळसचोंड कादंबरीः एक अभ्यास

**कु. राधिका संतोषराव सगणे**
विद्यार्थी
शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान (स्वायत) संस्था,
अमरावती.

देवदत्त चौधरी हे आदिवासी साहित्यातील एक महत्त्वाचे कवी व लेखक आहेत. त्यांचे 'तहान' व 'झडप' हे दोन कवितासंग्रह आणि त्या सोबतच 'पळसचोंड' ही कादंबरी प्रसिध्द झाली आहे.

'पळसचोंड' ही कादंबरी ९ ऑगस्ट २०१६ साली प्रसिध्द झाली आहे. मेघा पब्लिशिंग हाऊस, अमरावती यांनी ही कादंबरी प्रकाशित केली आहे. या कादंबरीत एकोणवीस घटना-प्रसंगाचे वर्णन केले आहे.

देवदत्त चौधरी लिखित कादंबरी 'पळसचोंड' यामध्ये लेखकाने पळसचोंड या गावाचे जीवनचित्र, तेथील आदिवासी लोकांचे समाजजीवन, त्यांची निसर्गाशी जोडलेली नाळ आणि शेवटी त्यांच्या साध्याभोळ्या जीवन जगण्याला आधुनिकतेचे चटके लागल्याने बदलत जाणारे त्यांचे जीवन, इत्यादी बाबींचे यथायोग्य वर्णन केलेले आहे. 'पळसचोंड' ही कादंबरी मुख्यतः गावाच्या हितासाठी झटणारा लक्ष्मणराव, गावाचा पाटील असून गावाचे हित न बघणारा, गावामध्ये पाटीलकीचा दबाब आणणारा भिवा पाटील, आपल्या शौर्याच्या बळावर आंजीला प्रेमाने जिंकणारा महाद्‌या, महाद्‌या व आजींच्या उमलल्या प्रेमाला साथ देऊन आशीर्वादाने आंजीला सून म्हणून स्वीकारणारे महाद्‌याचे आई-वडील येवाजी आणि बायजाबाई, तसेच जंगलातील शिकार सोबतीने करणारे, रानभाज्या गोळा करणारे, नदीतील मासे, जंगलातील ससे, शिकारीला सोबत जाणारे महादयाचे मित्र, काव्या, नाग्या, हिऱ्या, पाड्या व मोहनी लावणारा जाण्या आजा, आंजीचे सुखरुप घरीच बाळंतपन करणारी काशी सुयारीन, या सर्व पात्रांच्या भोवती ही कादंबरी फिरताना दिसते.

या कादंबरीचा आवाका, कालखंड, घटनाप्रसंग, पात्र फार विस्तृत नाहीत. या कादंबरीचे वाचन करताना वाचकांच्या मनात असा प्रश्नही सहज उद्‌भवू शकतो, की ही कादंबरी आहे की दीर्घकथा, परंतु कादंबरी म्हणून पात्र, ठरण्यासाठी लागणाऱ्या निकषावर ही कादंबरी पूर्णपणे खरी उतरते. कारण या कादंबरीमध्ये एकोणीस लघुकथा असून शंभर

पृष्ठांची ही कादंबरी आहे. लेखकाने कादंबरीचे निवेदन जरी मराठी भाषेमधून केले असले, तरी पात्रांच्या संवादाची भाषा मात्र कोकणी व डांगी असल्यामुळे ही कादंबरी अधिक वेगळी आणि विशेष वाटते.

देवदत्त चौधरी यांनी ‘पळसचोंड’ या कादंबरीला दिलेले शीर्षक अधिक सूचक आहे. आदिवासी जीवनामध्ये पळस या झाडाचे अनेक उपयोग आहेत. त्यांच्या रोजच्या जीवनामध्ये पळसाचे झाड फार उपयोगी असते. पळसाच्या पानाचे जेवणासाठी पत्रावळी तयार करणे, पाने विकून पैसे मिळवणे, पावसाळ्यात झोपडीवर पाने टाकून पाऊसापासून संरक्षण मिळवणे आणि पळसाचे फुल मोहणी घालणारे, त्याचे सौंदर्य आणि गडद रंग असल्यामुळे त्याचा उपयोग होळी या सणाला रंग तयार करण्यासाठी सुध्दा केला जातो. असा सांस्कृतिक संदर्भ असलेले शीर्षक लेखकाने कादंबरीला दिले आहे.

**कादंबरीची संकल्पना -**

कादंबरी या शब्दाला मराठीत जवळपास दीडशे वर्षांचा इतिहास आहे. कादंबरी या शब्दाचा मूळ अर्थ ‘कदंब पुष्पाची मदिरा’ किंवा ‘आसव’ असा उल्लेख जनार्दन लोक यांनी त्यांच्या ‘गीर्वाण’ लघुकोशात केलेला आहे.१

‘कदंब’ या फुलापासून मद्य तयार केले जाई, ज्याच्या सेवनाने व्यक्तीस एक प्रकारची धुंदी येत असे. व्यक्तीस अशी धुंदी आणणारी अद्‌भूतता, कल्पक व प्रणयप्रचुर कथा सर्वप्रथम संस्कृत कवी ‘बाणभट्ट’ यांनी रचली. या कथेतील नायिकेचे नाव त्यांनी ‘कादंबरी’ असे ठेवले ही कथा तत्कालीन वाचकांत अतिशय लोकप्रिय झाली, की ज्याचा परिणाम यापुढे लिहिल्या जाण्याऱ्या अद्‌भूत, काल्पनिक, प्रणयरम्य लेखनास ‘कादंबरी’ याच नावाने ओळखण्यात आले. ‘मराठी वाङ्मय तंत्र आणि आस्वाद’ या समीक्षा ग्रंथातील प्रा.डॉ. प्रकाश सूर्यवंशी यांनी लिहिलेल्या ‘मराठी कादंबरीः स्वरुप विचार’ या लेखातील विस्तृत विवेचनातून कादंबरी या शब्दाची उत्पत्ती कशी झाली? त्या कथानात्मक गद्यलेखन प्रकाराला कादंबरीच का म्हणायचे? हे जाणून घेण्यास पूरक ठरते.

कादंबरी हा लवचिक व सर्वसमावेशक साहित्यप्रकार असल्याने तिची परिपूर्ण व्याख्या करणे कठीण आहे, पण तरीही काही अभ्यासकांनी कांदबरीची लक्षणे, स्वरुप विचारात घेऊन

स्थूलमानने कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापैकी काही निवडक अभ्यासकांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे-

अर्नेस्ट बेकर यांच्या मते, ''ज्यात मानवी जीवनाचे स्पष्टीकरण केले गेले असेल असा गद्यात लिहिलेला कल्पित वृत्तांत म्हणजे कादंबरी होय.''२ तसेच

कॅथरीन लिव्हर यांच्या मते, ''कादंबरी म्हणजे कथनात्मे लिखित गद्याचा बऱ्यापैकी दीर्घ म्हणता येईल असा लेखकाने निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंगवून टाकणारा रचनाबंध होय.''३

तसेच मराठी साहित्याचे अभ्यासक भालचंद्र नेमाडे यांच्या मते, ''कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशय सूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत, अशी साहित्यकृती म्हणजे कादंबरी.''४

रा.ग.जाधव यांच्या मते, ''कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व यांना अनुरुप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरण निर्मिती, शैली इत्यादी घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय.''५

श्री.मा.कुलकर्णी यांच्या मते, '' कार्यकारण श्रृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडवणारी सविस्तर ललित गद्य कथा म्हणजे कादंबरी होय.''६

**आदिवासी साहित्याची संकल्पना -**

'आदि' आणि 'वासी' या दोन शब्दांपासून 'आदिवासी' हा सामाजिक शब्द बनलेला आहे. 'आदि म्हणजे प्रथम, सुरुवातीपासून आणि 'वासी' म्हणजे वास्तव्य करणारा या अर्थाने आदिवासी म्हणजे देशात अगदी प्रथम वस्ती करुन राहिलेले लोक असे म्हटले जाते. आजपर्यंत अनेक समाजशास्त्रज्ञांनी व भाषा तज्ज्ञांनी 'आदिवासी' शब्दाची विविधांगाने संकल्पना स्पष्ट केली आहे. आदिवासी समाज हा केवळ भारतातच आहे असे नाही, तर जगातील अनेक राष्ट्रांमध्ये हा समाज वास्तव्य करुन आहे. विशेषतः द. अफ्रिका, अमेरिका, फ्रान्स, ऑस्टेलिया यासारख्या प्रगत राष्ट्रांमध्ये आदिवासी समाज विपूल प्रमाणात आहे, असे डॉ. कृष्णा भवारी यांनी 'आदिवासी साहित्य, समाज, संस्कृती आणि विकास' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत नोंदवलेले

आहे. तसेच आदिवासी साहित्याचे दोन प्रवाह आहेत. आदिवासी तसेच आदिवासीएत्तर साहित्य. कारण आदिवासीएत्तर साहित्याच्या केंद्रस्थानी माणूस आणि निसर्ग आहे. असे मत संजय लोहकरे यांनी व्यक्त केले आहे. तसेच त्यांनी व आदिवासी साहित्याच्या इतर अभ्यासकांनी साहित्याच्या व्याख्या सांगितल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे-

**संजय लोहकरे यांच्या मते -**

'ज्या साहित्यात निसर्ग जाणिवा आणि आदिम मूल्यभान जपलेले आहे त्या साहित्याला आदिवासी साहित्य म्हणावे.'७ तसेच ''धर्मविरहित, वर्गविरहित, वर्णविरहित साहित्य संहिता ज्या साहित्यात येते त्या साहित्याला आदिवासी साहित्य म्हणावे''८

**आदिवासी कांदबरी-**

आदिवासी समाजाचे जीवनदर्शन घडविणारी व आदिवासी समाजकेंद्राभोवती आकारास आलेली कादंबरी म्हणजे आदिवासी कादंबरी अशी सर्वसाधारण व्याख्या करता येते.

ज्या कादंबरीत आदिवासी समाजाचे जीवनचित्रण येते ती कादंबरी म्हणजे आदिवासी कादंबरी.

१९२६ ते २०२४ पर्यंत मराठी आदिवासी साहित्यात जवळपास शंभर कांदबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. त्यातील काही महत्त्वाच्या कादंबऱ्या पुढील प्रमाणे-

१. श्री. व्यं. केतकर यांची 'गोंडवणातील प्रियंवदा' (१९२६)

२. नजूबाई गावित यांची 'कृष्णा' (१९९५)

३. दिनकर दाभाडे यांची 'बिलामत' (१९९४)

४. शंकरराव खरात यांची 'पारधी' (१९९७)

५. रमेश पटवर्धन यांची 'जांभुळपाडा' (१९९८)

६. एकनाथ साळवे यांची 'एन्काउंटर' (१९९१)

७. दीनानाथ मनोहर यांचे 'मनवंत' (१९९९)

८. बाबा भांड यांची 'तंट्या' (२००१)

९. गो. नि. दांडेकर यांची ‘माचीवरला बुधा’ (२००५)

१०. दीनानाथ नलावाडे यांची ‘लाडी’ (२००७)

११. विभावरी शिरुळकर यांची ‘बळी’ (२००६)

१२. विलास मनोहर यांची ‘एका’ नक्षलवाद्याचा जन्म (१९९२) इ.

**पळसचोंड कादंबरीतील निसर्ग जाणिवा-**

जंगलात राहणारे लोक, जांच्यावर जगाच्या आधुनिकीकरणाबद्दल तीळमात्रपण संबंध नसतो, असे लोक मुख्यतः त्यांच्या सर्व गरजांसाठी निसर्गावर अवलंबून असतात. निसर्गच त्यांचा देव आणि निसर्गच त्यांची माता. आईच्या उदरातून जन्म घेतल्यावर त्याचे पालन, पोषण करणारा निसर्ग जणूकाही त्यांची दुसरी आईच असतो.

‘पळसचोंड’ कादंबरीत लेखकाने आदिवासींचे जीवनचित्रण रेखाटले आहे. ते संपूर्णता निसर्गावरच आश्रित आहेत. तेथील लोक पोट भरण्यासाठी निसर्गातील कंदमुळे, पाला, फळे किंवा खेकडे, मासे, ससे अशा वन्यप्राण्यांची शिकार करुन खातात. जगात अत्याधुनिक औषधोपचार उपलबध् असताना ते जंगलातील झाडाच्या पाल्यापासुन निघणाऱ्या द्रवपदार्थाचा उपयोग औषधी म्हणून करतात. उदा- महाद्याला अर्ध्या रात्री झालेल्या उलट्यांचा उपचार उंबराचा डिंक खाऊन थांबवतात. तसेच जंगलात शिकारीसाठी गेलेल्या त्यांच्या मित्रावर रानडूकराने हल्ला केल्यावर त्याचे घाव हे झाडाच्या पाल्याच्या रसाने भरतात. असे औषधी उपचार रानातील झाडापासुन केल्याचे वर्णन कादंबरीत आहे.

आदिवासी जरी निसर्गाच्या सहवासात जगलात असला तरी निसर्गालाच आपला देव मानतो याचे उदाहरण पळसचोंड या कादंबरीत दिसून येते. उदा. ‘‘महाद्या माळात आला. कोणती कोणती झाडं खांडायची. त्यांची त्याने मनात आखणी केली. तो घामोडीच्या झाडाजवळ आला. झाडाच्या बुडाला पाया पडला. (पृष्ठ क्र.१८) पाया पडण्याचं कारण, निसर्ग हाच त्यांचा देव आहे. झाडाच्या पाया पडणे, किंवा आपल्या वडिलांसोबत डोंगरावर असलेल्या, वाघदेवतेच्या मूर्ती असलेल्या दगडाची पूजा करणे, नांगपचंमीला मार्मिकपणे निसर्गदेवतेकडे सुखरुप ठेवण्याची विनंती करणे, ही उदाहरणे आहेत या उदाहरणांच्या माध्यमातून लेखकाने निसर्गवर्णन केले आहे.

**पळसचोंड कांदबरीतील समाजजीवन-**

पळसचोंड कादंबरीमध्ये पळसचोंडीतील आदिवासी समाजजीवन लेखकाने रेखाटले आहे. पळसचोंडीतील लोकांचे जीवन निसर्गावर अवलंबून आहे. पळसचोंडीतील आदिवासी जीवन म्हणजे सकाळी उठायचं, शिळंपाकं खायचं आणि रानामध्ये जाऊन राबराब राबायचं. पळसचोंडीतील अर्थव्यवस्था ही मुख्यत्वे निसर्गावर अवलंबून आहे. पैसे कमवण्यासाठी त्यांना शहरात, मळ्यांमध्ये राबायला जावं लागतं. पण त्यांना रोजच्या खाण्यापिण्यासाठी निसर्गावर अवलंबून राहावे लागते. त्याचं पोट भरण्यासाठी निसर्ग समर्थ आहे. रानावनातील रानमेवा खाऊनच ते आपल्या पोटाची खळगी भरतात. पळसचोंडीत पाटील, कुणबी, कोळी आणि वारली या चारच जातीचे लोक वास्तव्यास आहेत. लक्ष्मणराव हा त्या गावचा मुख्य व्यक्ती किंवा त्या गावाचा राजा असे म्हटले तरी अतिशोक्ती ठरणार नाही. ते जिवंत होते तोपर्यंत त्यांनी गावातील लोकांवर प्रेम केले. दुष्काळात त्यांनी आपल्या घरातील धान्याची कणगी गावकऱ्यांसाठी रिक्त केली.

लक्ष्मणराव जिवंत असेपर्यंत पळसचोंड एकसारखी संथ गतीने आपल्या नित्यक्रम पार पाडत, येणाऱ्या काळाकडे मार्गक्रमण करत होती. पण लक्ष्मणरावांच्या मृत्यूनंतर जणूकाही आभाळच कोसळलं आणि पळसचोंडीचे चित्रच बदलले. गावात राजकारणाने प्रवेश केला. जातिवाद निर्माण झाला. लक्ष्मणरावामुळे आटोक्यात असलेला भिवा पाटलाचा स्वार्थ बाहेर उफाळून येऊ लागला. पळसचोंडीकरांचे शोषण व्हायला लागलं. पाटलाने सर्व गोष्टीवर मक्तेदारी मिळवून कोळी आणि वारली लोकांची अडवणूक करायला लागला. गावामध्ये येणाऱ्या योजनांचा लाभ त्या दोन जातीला न देण्याचा त्याने पुरेपुर प्रयत्न केला. अश्या प्रकारे पडसचोंड गावामध्ये पाटलाने राजकारण घडुन आणल्याचे दिसते.

सुरुवातीला अठरा प्रकरणांत आढळून येणारी पळसचोंडीची प्रतिमा-शेवटच्या एकोणीसाव्या प्रकरणात आल्यावर अचानक विरोधाभासी वाटायला लागते. माणुसकी हाच धर्म मानणारी माणसं मिशनऱ्यांच्या अमीषाला बळी पळून धर्मांतर करायला लागलेली दिसून येतात. आधुनिकतेचा शिरकाव त्या छोट्याशा गावात झाल्याने तेथील लोकांची दिनचर्या बदलली. निसर्गाला आपली माता, आपलं सर्वस्व मानणारी माणसं आता निसर्गापासून कशी दूर चाललीत हे या सर्व घटना प्रसंगाच्या माध्यमातून वास्तववादी चित्रण मांडण्याचा प्रयत्न देवदत्त चौधरी यांनी पळसचोंड या कादंबरीतून केला आहे.

**पळसचोंड कादंबरीतील सण, उत्सव -**

शेतीवर पोट भरणाऱ्या पळसचोंडकरांसाठी 'सण' म्हणजेच क्षणभर विश्रांती. पळसचोंडीत श्रीमंत महण्यायोग्य फक्त दोनच व्यक्ती आहेत. एक लक्ष्मणराव आणि दुसरा भिवा पाटील या दोघांचे गावात तीन मजली इमारतीचे घर आहे. बाकी सर्वांच्या झाडपाला, बांबु, सागाच्या, चिखलानी लिपलेल्या, शेणानी पोचारलेल्या कारवीचे, कुडाच्या झोपाड्या, एकंदरीत सर्वांचाच रोजच्या जगण्यासाठी रोजचाच वेगळा संघर्ष चालतो. अशा धकाधकीच्या जीवनातून विरंगुळ्याचा आणि आनंदाचा क्षण हा सणाच्या माध्यमातून येवून पळसचोंडकरांचे जीवन थोडे का होईना सुखकर करुन जाते.

सर्वसामान्य हिंदू धर्मातील सण पळसचोंडीतील आदिवासी साजरे करतात. पण त्यांचे सण साजरे करण्याची पध्दती वेगळीच आहे. त्यांची सण साजरी करण्याची पध्दती निसर्गाशी निगडित आहे. दसरा, दिवाळी, नागपंचमी, होळी इ. सर्व सणांचे वर्णन आणि ते सण साजरा करण्याची पळसचोंडीकरांची पध्दत, इत्यादींचे वर्णन कादंबरीत येतेच. पण त्यातील 'भोवाडा' हा उत्सव मात्र मुख्य आकर्षण ठरतो. तसा भोवाडा सर्वसामान्यांना अपरिचित असलेला सण हा मुख्यत्वे कोकणात साजरा करतात. या उत्सवामध्ये रामायण, महाभारतील व निसर्गामधील प्राणी यांचे मुखवटे बनवून, त्यांच्या वस्त्रांसहित परिधान करुन, सणई ढोलाच्या तालावर नाचतात. पूर्णपणे त्या मुखवट्यांचे किंवा प्राण्यांचे सोंग घेऊन बेभान होऊन नाचतात.

'भोवाडा' या सण ऊत्सवामध्ये मुख्य आकर्षण हे ग्रामदेवतेचे असते. एक व्यक्ती ग्रामदेवतेचा मुखवटा घालतो. त्याची मिरवणूक सर्वांत शेवटी निघते. ही मिरवणूक गावातून रात्रभर चालते. सर्व लोक ग्रामदेवतेला ईडा-पिडा टळून जाण्याची, धनधान्य भरभरून होऊ दे, अशी मागणी करुन व नैवैद्याचा भोग म्हणून बोकड्याचा बळी दिला जातो. अशा प्रकारे हा 'भोवाडा' सण साजरा केला जातो.

पळसचोंडीकर वर्षातील येणारे सर्वच सण साजरे करतात, पण त्यांच्या सर्वच सणांत एक गोष्ट मात्र कायम आहे, ते म्हणजे सामूहिक नाच. प्रत्येक सणाला रात्री ढोल-सणईच्या गजरात ते नाचतात आणि खऱ्या अर्थाने ते सण आनंदाने साजरे करतात.

**समारोप-**

देवदत्त चौधरी यांची 'पळसचोंड' ही कादंबरी (२०१६) आदिवासींचे निर्सगजीवन, समाजजीवन, सणोत्सव, धार्मिक जीवन इ. आशयकेंद्र स्पष्ट करते. या सर्वांचा वाङ्मयीन अभ्यास येथे केला आहे.

**निष्कर्ष-**

१. पळसचोंड या कादंबरीत कोकणा आदिवासींचे सांस्कृतिक जीवन वैशिष्ट्यपूर्ण रीतीने आले आहे.

२. पळसचोंड या कादंबरीमध्ये निसर्ग जाणिवाचा शोध घेतला आहे.

३. पळसचोंड या कादंबरीमध्ये आदिवासींचे सण उत्सव आलेले आहेत.

४. पळसचोंड या कादंबरीमध्ये आदिवासी जीवनातील संघर्ष, राजकारण आलेले आहे.

५. या कादंबरीत आंजी आणि महाद्याची निर्मळ प्रेमकथा आलेली आहे.

**संदर्भ ग्रंथ-**

१. सावळे, शशिकांत, आदिवासी साहित्य, समाज, संस्कृती आणि विकास, शब्दश्री प्रकाशन जुन्नर.

२. कादंबरी-संकल्पना व स्वरुप, मुक्तविद्यापीठ, नाशिक

३. तत्रैव, पेज-१७

४. तत्रैव, पेज-१८

५. तत्रैव, पेज-१९

६. तत्रैव, पेज-१९

७. उनि, सावळे, शशिकांत, प्रस्तावना, पेज-५७

८. लोहकरे, संजय, चळवळ आणि साहित्य, मेघा पब्लिशिंग हाऊस, अमरावती, २०२२

९. मोरे, नंदकुमार (संपा), १९९० नंतरची मराठी कादंबरी, शिविम संशोधन पत्रिका, एप्रिल, मे, जून, २०२२

१०. उनि, लोहकरे, संजय, पेज-१३२